क्रमांक : ११८४२/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
मुंबई, दिनांक : ०४ ऑगस्ट, २०२१.

**: : परिपत्रक : :**

या सचिवालयातील **"कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक" (Section Officer Cum Estate Manager)** (वेतनश्रेणी :- एस-१५-४१८००-१३२३००) गट-ब (राजपत्रित) हे पद रिक्त आहे. उक्त पदाच्या (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम-२०१४ अन्वये या पदावरील नियुक्ती खालीलपैकी कोणत्याही पध्दतीने करता येईल अशी तरतूद आहे :-

(अ) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील नियमित नियुक्ती असलेल्या कक्ष अधिकाऱ्यांमधून पात्र ठरविलेल्या व्यक्तीच्या नियुक्तीने,

किंवा

(ब) सहायक मालमत्ता व्यवस्थापक पदावर किमान तीन वर्ष सेवा पूर्ण केलेल्या व सदर पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीच्या सेवाजेष्ठता-नि-अर्हतेच्या आधारे पात्र ठरविलेल्या व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे,

किंवा

(क) विधानमंडळ सचिवालयातील किमान पाच वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या सहायक कक्ष अधिकाऱ्यांमधून पात्र ठरविलेल्या व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे.

**कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक** पदावर नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यास "कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक" पदावर कमीत कमी ३ वर्षे काम पहावे लागेल व तसा अंगिकारनामा कार्यालयाकडे द्यावा लागेल. परंतु, "कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक" पदावर नियुक्त होणारा अधिकारी या सचिवालयातील अन्य संवर्गात पदोन्नतीकरीता पात्र असल्यास त्यास त्या पदावर पदोन्नती स्विकारता येईल.

नियमातील उपरोक्त तरतूदीच्या अधीन राहून कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक हे पद भरावयाचे असल्याने या सचिवालयातील कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व सहायक मालमत्ता व्यवस्थापक संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून याद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. "कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक" या पदासाठी इच्छुक असलेल्या व उपरोक्त पात्रता धारण करणाऱ्या

..२/-

अधिकारी/कर्मचारी यांनी सोबत दिलेल्या नमूना आवेदन पत्रानुसार त्यांचे अर्ज सादर करावयाचे आहेत. इच्छूक अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत कार्यालयास सादर करावेत. विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) सर्व कक्ष अधिकारी
२) सर्व सहायक कक्ष अधिकारी/सहायक मालमत्ता व्यवस्थापक

**प्रतिलिपी :-**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

२) विशेष कार्य अधिकारी (श्री.महाजन), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

३) उप सचिव (श्री.तारवी), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

४) अवर सचिव (श्री.जगदाळे), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

५) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

# :: आवेदन पत्राचा नमूना ::

**प्रति,**

मा.प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.

**विषय : "कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक" पदासाठी आवेदन पत्र.**

**महोदय,**

"कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक" पदासाठी मी आवेदन पत्र सादर करीत असून माझी वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे आहे :-

**१) नाव व पदनाम** :

**२) या सचिवालयातील प्रथम नियुक्तीचे पद व दिनांक** :

**३) धारण केलेली पदे व कालावधी** :

**४) कक्ष अधिकारी / सहायक कक्ष अधिकारी /सहायक मालमत्ता व्यवस्थापक पदावर नियमित नियुक्ती झाल्याचा दिनांक व कालावधी** :

**५) शैक्षणिक अर्हता** :

**६) जन्म तारीख व वय** :

**७) निवासस्थानाचा पत्ता** :

**८) जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केल्याचा दिनांक** :

**आपला/आपली,**

( )

D:\E drive\२०२१\promotion\STEWARD\Proforma.doc